# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २०/१०/२०२२ (गुरूवार)**

**(दुपार)**

---

### अपघातात मृत्यु

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत ५३ कि. मी. अंतरावरील मौजा बोरगाव शिवार येथे दिनांक १९/१०/२२ चे ०२.०० वा. सुमारास वंसता गजाजन कुंभारे(मृतक), वय ३२ वर्ष, रा. आधंगाव ता. मोहाडी जि. भंडारा ह.मु गणेश चौक मौदा हा शिवालिक धाब्या समोरील नॅशनल हायवे क्र ५३ नागपूर कडुन भंडारा कडे जाणरा रोड क्रास करीत असतांना अज्ञात वाहन चालक आरोपीने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन रोड क्रास करित असलेला वंसता गजाजन कुंभारे यांना जोरदार धडक दिली. या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर मार लागून ते जागीच मरण पावले.

सदर प्रकरणी परी पोउपनि प्रितम पिपंळकर पोलीस स्टेशन मौदा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ अ भादवी सहकलम १८४,१३४,१७७ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोना निशांत मेश्रामा मो.नं. ९७६३१६३१०७ हे करीत आहे.

### विश्वासघात करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत २० कि.मी. अंतरावरील अंडा कंपनी डोरली शिवार दि. २६/०९/२२ चे २१.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— संदीप चंदुजी धुर्वे, वय २८ वर्ष, रा.वरोडा बरंड पाण्याचे टाकी जवळ ता. कळमेश्वर जि. नागपुर आणि आरोपी नामे— मनराज सिताराम कुसराम रा. कार्ली ता.सौसर जि. छिंदवाडा हे एकमेकांना ओळखत असुन नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी व आरोपी हे फिर्यादी चे एमएच—४०/सीके— ८४९५ क्रमांकाच्या मोटारसायकल वर काम शोधण्याकरीता गेले होते. आरोपीने फिर्यादीला मोटारसायकल चाबी मागीतली ती चाबी विश्वासाने आरोपीला दिली. आरोपीने मोटारसायकल सुरू करून घेवुन गेला परत आलेला नाही.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ४०६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास ग्रेड पोलीस उपनिरीक्षक प्रकाश हिवरकर मो.क्र. ९८८१५९५९९९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर